# पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ, सोलापूर
## Punyashlok Ahilyadevi Holkar Solapur University, Solapur

केगाव, सोलापूर - ४१३ २५५, महाराष्ट्र (भारत)
दुरध्वनी : ०२१७-२७४४७७१/७२/७३ (११ लाईन्स), Ext- १२५ फॅक्स : ०२१७-२३५१३०
संकेतस्थळ: www.sus.ac.in ई-मेल: phd@sus.ac.in

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ
॥ विद्यया संपन्नता ॥
NAAC Accredited-2022
'B++ Grade (CGPA 2.96)

संशोधन विभाग

Research Section


संदर्भ क्र. पुअहोसोविसो/शै.सं.व.वि./संशोधन विभाग/२०२६/ 2894

दिनांक: - 2 APR 2026

**अत्यंत महत्वाचे**

**प्रति,**
**प्राचार्य/संचालक,**
संलग्नित महाविद्यालय/मान्यताप्राप्त संस्था/प्रस्तुत विद्यापीठ संकुले,
पु.अ.हो. सोलापूर विद्यापीठ, सोलापूर.

**विषय :** **पीएच.डी. मार्गदर्शकांकडील प्रवेश क्षमतेबाबतची माहिती व संशोधन केंद्राची अद्ययावत माहिती Edulab Software प्रणालीमध्ये ऑनलाईन पध्दतीने भरण्याबाबत.**

**संदर्भ :** **प्रस्तुत विद्यापीठाचे पत्र क्र. पुअहोसोविसो/शै.सं.व.वि./संशोधन विभाग/२०२६/२३९२ दि. १७-३-२६ रोजीचे पत्र**

**महोदय/महोदया,**

उपरोक्त विषयी संदर्भीय पत्रान्वये (PET १०) प्रवेश प्रक्रियेकरीता संलग्नित पदव्यूत्तर (PG) महाविद्यालयात (संधोधन केंद्र मान्यता असलेल्या) पूर्णवेळ कार्यरत मार्गदर्शकांची प्रवेश क्षमतेबाबची माहिती व संशोधन केंद्राची अद्ययावत माहिती Edulab Software प्रणालीमध्ये महाविद्यालयाकडील लॉगीनमधून भरुन आवश्यक ती सर्व कागदपत्रे अपलोड करुन **दि. ३०/०३/२०२६** पर्यंत ऑनलाईनरित्या सादर करण्याबाबत कळविण्यात आलेले होते. तथापि ब-याच महाविद्यालयांनी सदर माहिती मुदतीत भरली नसल्याचे विद्यापीठाच्या निदर्शनास आलेले आहे.

त्याअनुषंगाने आपणास आदेशान्वये कळविण्यात येते की, आपल्या पदव्यूत्तर (PG) महाविद्यालयात (संधोधन केंद्र मान्यता असलेल्या) पूर्णवेळ कार्यरत मार्गदर्शकांची पीएच.डी. (PET १०) प्रवेश क्षमतेबाबची माहिती व संशोधन केंद्राची अद्ययावत माहिती Edulab Software प्रणालीमध्ये महाविद्यालयाकडील लॉगीनमधून भरुन आवश्यक ती सर्व कागदपत्रे अपलोड करुन **दि. १३/०४/२०२६** पर्यंत ऑनलाईनरित्या सादर करण्यास मुदतवाढ देण्यात येत आहे.

सदर मुदतीत पात्र मार्गदर्शकांची माहिती विहित वेळेत विद्यापीठास प्राप्त न झाल्यास त्या संबंधित मार्गदर्शक यांच्या नावाचा समावेश PET १० प्रक्रियेमध्ये करण्यात येणार नाही, त्याची सर्वस्वी जबाबदारी संबंधीत मार्गदर्शक व प्राचार्य / संशोधन केंद्र याची राहिल, याची नोंद घ्यावी. तसेच यासंदर्भात काही तांत्रिक अडचण असल्यास ९१५२२५२०४५ या हेल्पलाईन क्रमांकावर संपर्क करावा.

**आपला स्नेहांकित,**

(डॉ. म. स. रोकडे)
**उपकुलसचिव**

**सोबत :**
पीएच.डी. प्रवेश क्षमता कळविण्याबाबत मार्गदर्शक सुचना.

**प्रत :** १) मा. कुलगुरु महोदय यांचे कार्यालय, प्रस्तुत विद्यापीठ. २) मा. प्र-कुलगुरू महोदय यांचे कार्यालय, प्रस्तुत विद्यापीठ.
२) गोपनीय फर्म यांना सदर पत्राची प्रत देऊन कळविण्यात येते की, वरीलप्रमाणे ऑनलाईन लिंक दि. १३/०४/२०२६ रात्री १२:०० वाजता बंद करण्यात यावी.

# पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ, सोलापूर

## संशोधन विभाग

दिनांक ०२/०४/२०२६

**संशोधन मार्गदर्शकांकरीता पीएच.डी. प्रवेश क्षमता कळविण्याबाबत महत्वाच्या सूचना.**

१ प्रस्तुत विद्यापीठ / संलग्नित महाविद्यालयात पदव्यूत्तर (PG) विभाग व संबंधित विषयाचे संधोधन केंद्र मान्यता असलेल्या तेथील पूर्णवेळ कार्यरत मार्गदर्शकांचीच सदर माहिती ऑनलाईन भरावी.

२ २०२२ रोजीच्या पीएच.डी. रेग्युलेशन प्रमाणे पीएच.डी. संशोधक विद्यार्थी संख्या ही शिक्षकांच्या पदानुसार असल्याने त्या प्रमाणातच प्रवेश क्षमता कळवावी. तथापि सध्या कार्यरत विद्यार्थी व आता भरणार असलेली प्रवेश क्षमता ही आपल्या पदानुसार असलेल्या प्रवेश क्षमतेएवढीच असणे आवश्यक आहे. त्यापेक्षा जादा प्रवेश क्षमता देता येणार नाही.

a.प्राध्यापक - ८
b.सहयोगी प्राध्यापक - ६
c. सहायक प्राध्यापक - ४
d. शास्त्रज्ञ - ८

३ दि. ०७ नोव्हेंबर २०२२ रोजीच्या पीएच.डी. रेग्युलेशन प्रमाणे ज्या मार्गदर्शकांची सेवा ०३ वर्षापेक्षा कमी राहिलेली आहे, त्यांना नव्याने विद्यार्थी क्षमता कळविता येणार नाही. तथापि त्यांच्याकडे यापूर्वी असलेले विद्यार्थी बाहेर पडेपर्यंत त्यांना मार्गदर्शन करु शकतात.

४ ज्या नवीन संशोधन केंद्रांना विद्यापीठाकडून मान्यता मिळालेली आहे, परंतु त्यांच्याकडे Edulab Software चे लॉगीन नाही, त्या नवीन संशोधन केंद्रांनी सोबतच्या पत्रामध्ये नमूद केलेल्या हेल्पलाईन क्रमांकावर संपर्क करुन लॉगीन प्राप्त करुन घेऊन पूर्णवेळ कार्यरत मार्गदर्शकांची पीएच.डी. करीता प्रवेश क्षमतेबाबची माहिती व संशोधन केंद्राची अद्ययावत माहिती Edulab Software प्रणालीमध्ये ऑनलाईन माहिती नमूद करुन आवश्यक ती सर्व कागदपत्रे अपलोड करावीत.

**महाविद्यालयातील प्राचार्य / संचालक यांना उपरोक्त माहिती देण्याबाबत आवश्यक सुचना :**

५ प्रस्तुत विद्यापीठ / संलंग्नित महाविद्यालयातील मार्गदर्शक यांचे Specilization, Research Guide Approved Subject, Research Center Approval Date with Reference No, Research Guideship Approval Date with Reference, P.G. Teacher Approval Date with Reference संबंधित विषयातील पदव्युत्तर अभ्यासक्रमास विद्यापीठाने संलग्नीकरण दिल्याचे मान्यता पत्र ऑनलाईन अपलोड करण्यात यावे.

६ मार्गदर्शकांची माहिती व संशोधन केंद्रासंदर्भातील अद्ययावत माहिती अचुक भरण्यात यावी.

७. सर्व रकान्यांची माहिती भरणे आवश्यक आहे.

८ ज्या ठिकाणी माहिती उपलब्ध नाही अथवा निरंक आहे त्याठिकाणी Nil भरावे.

९. सोबतच्या एक्सेलमध्ये नमूद करण्यात आलेल्या सर्व हेडची माहिती Edulab Software प्रणालीमध्ये महाविद्यालयाकडील लॉगीनमधून भरुन आवश्यक ती सर्व कागदपत्रे अपलोड करण्यात यावीत.

१०. ज्या संशोधन मार्गदर्शक यांच्याकडे विद्यार्थ्यांच्या पीएच.डी. प्रवेशासाठी रिक्त जागा नाहीत, त्यांनीही Edulab Software प्रणालीमध्ये महाविद्यालयाकडील लॉगीनमधून सदरची माहिती भरणे अनिवार्य आहे.

११. आपल्या महाविद्यालयातील सर्व मार्गदर्शकांची माहिती देण्याची जबाबदारी मा. प्राचार्य / मा. संचालक यांच्यावर असेल, कोणत्याही मार्गदर्शकांची माहिती पाठविणे राहणार नाही याची दक्षता घ्यावी.

(डॉ. म. स. रोकडे)
**उपकुलसचिव**